इयत्ता - ८वी

# प्रथम सत्र - संकलित मूल्यमापन - २०१८-१९

## विषय - मराठी

**प्र.१ला** खालील उतारा लक्ष्यपूर्वक वाचा व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (गुण ५)

ज्येष्ठ महिना सुरू झाला, की पावसाचे वेध लागतात. सोसाट्याचा वारा आणि पहिल्या पावसाच्या सरींची वार्ता पसरवणारा मातीचा सुगंध हे अगदी प्रत्येक वर्षी येतच असतं. तरीही ते दरवेळी नवीन वाटतं. बालपणी बेफाम होऊन 'ये गं ये गं सरी, माझे मडके भरी'च्या तालावर पावसात चिंब चिंब भिजणं आणि त्याबद्दल आई-वडिलांकडून पोटभर मार खाणं. आजी-आजोबांकडून कागदी होड्या करायला शिकून त्या पावसाच्या पाण्यात सोडण्यासाठी पुन्हा पावसाची आतुरतेने वाट पाहणं. अशा कितीतरी आठवणी घेऊन दरवर्षी पाऊस येत असतो; पण मोठं झाल्यावर इंद्रधनुष्यात उमलणाऱ्या रंगांचे अर्थ उमगू लागतात. बरसण्याचा अर्थ कळू लागतो आणि हुरहूर, तळमळ अशा शब्दांचा थेट प्रत्यय येऊ लागतो. पावसाच्या आगमनाने गतकाळातले "ते क्षण" पुन्हा जिवंत होतात. डोळ्यांसमोर येऊ लागतात आणि कधी कधी पापण्यांमधून अलगदपणे वाहूनही जातात. मग डोळ्यांतला कोणता

१. पावसाच्या सरींची वार्ता कोण पसरवतो? (१)
२. कागदी होड्या कोणाकडून करायला शिकून घेतो? (१)
३. कधी इंद्रधनुष्यात उमलणाऱ्या रंगांचे अर्थ उमगू लागतात (१)
४. तक्ता पूर्ण करा. (२)

पावसामुळे या शब्दांचा थेट प्रत्यय येतो.

① [ ] ② [ ]

**प्र.२रा** खालील कवितेच्या ओळी लक्षपूर्वक वाचा व दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (गुण ५)

आभाळाची अम्ही लेकरे, काळी माती आई
जात वेगळी नाही आम्हा धर्म वेगळा नाही ।।

श्रमगंगेच्या तीरावरती
कष्टकऱ्यांची अमुची वसती
नाव वेगळे नाही आम्हा गाव वेगळा नाही ।।

इमान आम्हा एकच ठावे
घाम गाळुनी काम करावे
मार्ग वेगळा नाही आम्हा स्वर्ग वेगळा नाही ।।

माणुसकीचे अभंग नाते
अम्हीच अमुचे भाग्यविधाते
पंथ वेगळा नाही आम्हा संत वेगळा नाही ।।

कोटि कोटि हे बळकट बाहू
जगन्नाथ-रथ ओढुन नेऊ
आस वेगळी नाही आम्हा ध्यास वेगळा नाही ।।

Scanned by CamScanner

① कल्पकयाचे माता-पिता कोण आहेत? ①
② कल्पकत्याचे स्थान कोणते? ①
③ कवितेतील 'आत्मविश्वास' व्यक्त करणाऱ्या काव्यपंक्ती लिहा. ②
④ 'अखंड' या शब्दाचे कवितेत आलेले समानार्थी शब्द लिहा. ①

प्र ३ रा खालील बातमी वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा. (गुण ५)

दिनांक : १२ डिसेंबर

**क्रीडाविश्व**

**दापोली येथे राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन**

दापोली (जि. रत्नागिरी): येथे 'भारत क्रीडा मित्रमंडळाच्या' वतीने २ जानेवारी ते १२ जानेवारी या कालावधीत राज्यस्तरीय कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. भारतीय कबड्डी संघाचा कर्णधार अजय ठाकूर यांच्या हस्ते या स्पर्धेचे उद्घाटन करण्यात येणार असल्याची माहिती आयोजकांनी स्पर्धेनिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पत्रकार परिषदेदरम्यान दिली.

राज्याच्या विविध जिल्ह्यांतील सुमारे २० संघांनी अद्याप या स्पर्धेमध्ये सहभागी होण्यासाठी नोंदणी केली आहे. १८ डिसेंबर ही या स्पर्धेसाठी संघाचे नाव नोंदवण्याची शेवटची तारीख आहे.

'मेट्रो स्पोर्ट्स' या जिल्ह्यातील प्रसिद्ध क्रीडाविषयक साहित्याची विक्री करणाऱ्या दुकानाने या स्पर्धेचे प्रायोजकत्व स्वीकारले आहे. या स्पर्धेत प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांक मिळवणाऱ्या संघांना अनुक्रमे १ लाख, ५० हजार आणि २५ हजार रुपयांचे बक्षिस देण्यात येणार असल्याची माहिती 'मेट्रो स्पोर्ट्स' चे मालक स्वानंद पाटील यांनी दिली.

① कोण ते लिहा. ②
a) कबड्डी स्पर्धेचे उद्घाटक –
b) कबड्डी स्पर्धेचे आयोजक –

② 'मेट्रो स्पोर्ट्स' च्या मालकाचे नाव काय? ①
③ स्पर्धेसाठी नाव नोंदणीची अंतिम तारीख कोणती? ①
④ भारतीय कबड्डी कर्णधाराचे नाव काय?

Scanned by CamScanner

(व्याकरण)

प्र ४ था (अ) खालील शब्दांचे समानार्थी शब्द लिहा (३)
(१) बातमी –  (२) मृदा –
(३) नयन –

(ब) विरुद्धार्थी शब्द लिहा. (३)
(१) मान × ____  (२) उदास × ____  (३) गुण × ____

(क) खालील शब्दांचे वचन बदला. (२)
(१) मन –  (२) माणूस –

(ड) खालील वाक्यांचे प्रकार ओळखा व लिहा. (२)
१. तू काम करशील?
२. माणुसकी जपा.

(इ) खालील वाक्यांचे काळ ओळखा. (२)
१. मी उद्या गावाला जाणार आहे.
२. ती ~~कक~~ काल शाळेत आली होती.

(ई) खालील वाक्यातील ~~आम~~ ~~ब~~ विशेषण शब्दाला अधोरेखित करा. (३)
१) हे घर बंद होते.
२) किल्ला फारच सुंदर होता.
३) पुस्तक हा आपला मित्र असतो.

प्र ५ वा पत्र लेखन (गुण ५)

(१) तुमच्या शाळेमध्ये उन्हाळी सुट्टीत 'हस्ताक्षर सुंदर करूया!' हे १० दिवसांचे शिबिर आयोजित केले आहे. त्यात तुम्हाला सहभागी करून घेण्याची विनंती करणारे पत्र वर्गशिक्षकांना लिहा.

प्र ६ वा निबंध लेखन - (गुण ५) कोणत्याही एका विषयावर १० ओळी निबंध लिहा.
१) पोळा (२) दिवाळी
३) माझी शाळा. (४) १५ ऑगस्ट

प्र ६वा खालील जाहिरातीचे वाचन करा व प्रश्नांची उत्तरे लिहा. (५गुण)

> **निसर्गमित्र**
>
> धरूनी कास पर्यावरणाची काळजी घेऊ निसर्गाची
>
> SAY NO TO PLASTIC BAG
>
> पर्यावरणपूरक साधनांचे घाऊक व्यापारी
>
> **आमची वैशिष्ट्ये:**
>
> - पर्यावरण पूरक साधने
> - प्लॅस्टिकला पर्यायी साधने उपलब्ध
> - स्वयंपाकघरातील वापरासाठी लाकडी व मातीच्या वस्तू उपलब्ध (रवी, चमचे, पळी, उलथणे, पातेली, तवे इ.)
> - केळीच्या सोप्यापासून तयार केलेली भांडी उपलब्ध (डिश, ताटं, वाट्या, चमचे इ.)
> - घरपोच सेवा उपलब्ध
>
> त्वरा करा! त्वरा करा
> प्लॅस्टिकच्या बाटल्या जमा करा
> व खरेदीवर आकर्षक सूट मिळवा.
>
> संपर्क क्रमांक. - ८२८३५०५५२०
>
> टीप: समारंभामधील उपयुक्त साधनांच्या ऑर्डर घेतल्या जातील.

१. जाहिरात कोणत्या गोष्टींची आहे? ①
२. कोणत्या गोष्टींची पर्यायी साधने उपलब्ध आहेत? ②
३. जाहिरातीप्रमाणे कसली ऑर्डर घेतली जाईल? ②

प्र ८वा खाली दिलेल्या वाक्यांचे English मध्ये भाषांतर करा. ⑤

१. माझ्या शाळेचे नाव धारावी मनपा इंग्रजी शाळा क्र १ आहे
२. माझे नाव समीर आहे.
३. तु आंबा आवडतो?
४. तुझा आवडता प्राणी कोणता?
५. मुंबई खूप मोठे शहर आहे.